RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ४, अंक ५२] बुधवार, मे २, २०१८/वैशाख १२, शके १९४० [पृष्ठे ११, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मे २०१८

### अधिसूचना

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक सीईटी-२०१६/प्र.क्र.१२८/मशि-२.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८) याच्या कलम-३ ची पोट-कलमे (१) व (२) यांसह कलम २ च्या खंड (द) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि शासकीय अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.२१०/मशि-२, दिनांक २१ जानेवारी २०१६ याचे अधिक्रमन करून महाराष्ट्र शासन याद्वारे,—

(एक) यासोबत जोडलेल्या अनुसूची-अ च्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेले पदवीपुर्व शिक्षणशास्त्र व्यावसायिक अभ्यासक्रम हे व्यावसायिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम म्हणून अधिसूचित करीत आहे आणि उक्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या पात्रतेच्या अटी व आवश्यकता ह्या, अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील, असे विनिर्दिष्ट करीत आहे ;

(दोन) यासोबत जोडलेल्या अनुसूची-ब च्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेले पदव्युत्तर शिक्षणशास्त्र व्यावसायिक अभ्यासक्रम हे व्यावसायिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम म्हणून अधिसूचित करीत आहे आणि उक्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या पात्रतेच्या अटी व आवश्यकता ह्या, अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील, असे विनिर्दिष्ट करीत आहे.

## अनुसूची-अ

| अ. क्र. (१) | | व्यावसायिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम (२) | प्रवेशासाठी पात्रतेच्या अटी व आवश्यकता (३) |
|---|---|---|---|
| १ | क | शिक्षणशास्त्र स्नातक (बी.एड.) पदवी प्राप्त करण्यासाठी शिक्षणशास्त्र स्नातक अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि त्याने, एकतर विज्ञान/ सामाजिकशास्त्र/ मानव्यशास्त्र मध्ये किमान ५० टक्के गुण प्राप्त करून (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) पदवी आणि/किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी, अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र विज्ञानामधील व गणितामधील विशेषज्ञतेसह किमान ५५ टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ५० टक्के गुण) पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. |
| | ख | शिक्षणशास्त्र स्नातक (बी.एड.) पदवी प्राप्त करण्यासाठी मुक्त व दूरस्थ अध्यापन शिक्षण पद्धतीमार्फत शिक्षणशास्त्र पदवी अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि तो,---<br>(एक) प्राथमिक शिक्षणातील प्रशिक्षित कार्यरत शिक्षक असावा.<br>(दोन) ज्यांनी एन.सी.टी.ई. (राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद) मान्यताप्राप्त शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम नियमित पद्धतीने पूर्ण केला आहे, असे उमेदवार असावेत. |
| | ग | शिक्षणशास्त्र स्नातक (बी.एड.) पदवी प्राप्त करण्यासाठी (अंशकालीन) शिक्षणशास्त्र पदवी अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि तो,---<br>(एक) अर्ज करतेवेळी किमान दोन वर्षांसाठी पूर्णवेळ शिक्षक म्हणून सेवेत असतील असे उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षक असावा आणि तो या अध्ययनक्रमाच्या पूर्ण कालावधीच्या काळात सेवेत कार्यरत राहील. अर्जदार जेथे नोकरी करीत आहे त्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडून तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.<br>(दोन) अर्जदाराने एकतर विज्ञान/ मानव्यशास्त्र/सामाजिकशास्त्र मध्ये किमान ५० टक्के गुण प्राप्त करून (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) पदवी आणि/किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी किंवा विज्ञानाची पार्श्वभूमी असणाऱ्या / त्यात विशेषज्ञता असणाऱ्या व गणित या विषयांसह अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र पदवी परीक्षा किमान ५० टक्के गुण प्राप्त करून (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) उत्तीर्ण केलेली असावी किंवा त्यास समतुल्य अशी कोणतीही अर्हता असावी. |
| | घ | बी.एस.सी. बी.एड. (विज्ञान स्नातक आणि शिक्षणशास्त्र स्नातक)/बी. ए. बी. एड. (कला स्नातक आणि शिक्षणशास्त्र स्नातक) पदवी प्राप्त करण्यासाठी ४ वर्षीय संकलित पदवी अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि त्याने उच्च माध्यमिक/+२ यामध्ये किमान ५० टक्के गुण (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाचा उमेदवार असल्यास किमान ४५ टक्के गुण) प्राप्त केलेले असावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | क | शिक्षणशास्त्र (बी.एड.) (विशेष शिक्षण-दृष्टी क्षीणता) पदवी प्राप्त करण्यासाठी बी.एड. अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि त्याच्याकडे एकतर विज्ञान/सामाजिकशास्त्र/ मानव्यशास्त्र मध्ये किमान ५० टक्के गुण प्राप्त करून (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) पदवी आणि/किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी **किंवा** अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र ५५ टक्के गुणांसह विज्ञान व गणित यातील विशेषज्ञतेसह प्राप्त करून (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ५० टक्के गुण) यातील पदवी असावी किंवा त्याच्याशी समतुल्य अशी इतर कोणतीही अर्हता असावी. |
| | ख | शिक्षणशास्त्र (बी.एड.) (विशेष शिक्षण-श्रवण क्षीणता) पदवी प्राप्त करण्यासाठी बी.एड. अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | |
| | ग | शिक्षणशास्त्र (बी.एड.) (विशेष शिक्षण-मानसिक विकलांगता व बौद्धिक विकलांगता) पदवी प्राप्त करण्यासाठी बी.एड. अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | |
| | घ | शिक्षणशास्त्र (बी.एड.) (विशेष शिक्षण-अध्ययन विकलांगता) पदवी प्राप्त करण्यासाठी बी.एड. अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | |
| | च | शिक्षणशास्त्र (बी.एड.) (विशेष शिक्षण-ऑटीझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर) पदवी प्राप्त करण्यासाठी बी.एड. अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | |
| | छ | शिक्षणशास्त्र (बी.एड.) बी.एड. (विशेष शिक्षण-अनेकत्व विकलांगता) पदवी प्राप्त करण्यासाठी बी.एड. अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | |
| ३ | | शारीरिक शिक्षण स्नातक (बी.पी.एड.) पदवी प्राप्त करण्यासाठी शारीरिक शिक्षण पदवी अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | (क) उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि त्याच्याकडे कोणत्याही शाखेतील,----<br>(एक) किमान ५० टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) कोणत्याही विद्या शाखेतील पदवी असावी आणि एआययू (असोसिएशन ऑफ इंडियन युनिर्व्हसिटी)/ आयओए (इंडियन ऑलंपिक असोसिएशन)/एसजीएफआय (स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया)/ भारत सरकार यांच्याकडून मान्यताप्राप्त क्रीडा व खेळ यामध्ये आंतर महाविद्यालयीन/ आंतर विभागीय/ जिल्हा/ शालेय स्पर्धांमध्ये किमान सहभाग घेतलेला असावा.<br>किंवा<br>(ख) किमान ४५ टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) शारीरिक शिक्षणामधील पदवी असावी.<br>किंवा<br>(ग) किमान ४५ टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | टक्के गुण) कोणत्याही विद्या शाखेमधील पदवी असावी आणि शारीरिक शिक्षण हा विषय अनिवार्य/पर्यायी विषय म्हणून अभ्यास केलेला असावा.<br>किंवा<br>(घ) किमान ४५ टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) पदवी असावी आणि त्याने राष्ट्रीय/ आंतरविद्यापीठीय/ राज्य स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेला असावा, किंवा एआययू (असोसिएशन ऑफ इंडियन युनिर्व्हसिटी)/ आयओए (इंडियन ऑलंपिक असोसिएशन)/ एसजीएफआय (स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया)/ भारत सरकार यांनी मान्यता दिलेल्या क्रीडा प्रकारांत व खेळांमध्ये आंतर महाविद्यालय/ आंतर विभागीय/ जिल्हा/ शालेय स्पर्धांमध्ये पहिले, दुसरे किंवा तिसरे स्थान पटकावलेले असावे.<br>किंवा<br>(ड) उमेदवाराने पदवी धारण केलेली असावी व तो आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी झालेला असावा किंवा त्याने एआययू (असोसिएशन ऑफ इंडियन युनिर्व्हसिटी)/ आयओए (इंडियन ऑलंपिक असोसिएशन)/ एसजीएफआय (स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया)/ भारत सरकार यांनी मान्यता दिलेल्या क्रीडा प्रकारांत व खेळांमध्ये आंतर महाविद्यालयीन आंतर विभागीय/ जिल्हा/ शालेय स्पर्धेमध्ये पहिले, दुसरे किंवा तिसरे स्थान पटकावलेले असावे.<br>किंवा<br>(च) किमान ४५ टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) पदवी असावी आणि त्याला किमान तीन वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा (प्रतिनियुक्तीवर सेवेत असणाऱ्या उमेदवारांकरिता प्रशिक्षित शारीरिक शिक्षण शिक्षक/ प्रशिक्षक). |

## अनुसूची-ब

| अ.क्र. | | व्यावसायिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम | प्रवेशासाठी पात्रतेच्या अटी व आवश्यकता |
|---|---|---|---|
| (१) | | (२) | (३) |
| १ | क | शिक्षणशास्त्र स्नातकोत्तर (एम.एड.) पदव्युत्तर पदवी प्राप्त करण्यासाठी शिक्षणशास्त्र पदवी अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि त्याने, किमान ५० टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) खालील पदवी परीक्षा किंवा समतुल्य पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>(१) बी.एड.,<br>(२) बी.ए. बी.एड/बी.एस्सी.बी.एड.,<br>(३) बी.ईएल.एड., |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (४) डी.ईएल.एड. स्नातकपूर्व पदवीसह [प्रत्येकी ५० टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत ४५ टक्के)]. |
| | ख | बी.एडएम.एड (शिक्षणशास्त्र स्नातक-शिक्षणशास्त्र स्नातकोत्तर) ३ वर्षीय संकलित पदवी अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि त्याच्याकडे पुढील अर्हता असावी,<br>**अनिवार्य:-** किमान ५५ टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ५० टक्के गुण) विज्ञान/सामाजिकशास्त्र/ मानव्यशास्त्र या विषयांतील पदव्युत्तर पदवी किंवा समतूल्य श्रेणी असावी.<br>**ऐच्छिक:-** शिक्षणामध्ये स्पष्ट दिसणारी आवड व अनुभव. |
| २ | क | शिक्षणशास्त्र स्नातकोत्तर विशेष शिक्षण पदवी (एम. एड-विशेष शिक्षण) अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | शिक्षणशास्त्र स्नातकोत्तर विशेष शिक्षण पदवी (एम.एड-विशेष शिक्षण) अभ्यासक्रमामध्ये पुढील उमेदवारांना प्रवेश मिळेल,<br>**(एक)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान ५० टक्के गुणांसह संबंधित विकलांगता क्षेत्राची शिक्षणशास्त्र विशेष शिक्षण पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेले किंवा भारतीय पुनर्वास परिषदेकडे नोंदणीसह विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता असलेल्या कोणत्याही विद्यापीठाचे संलग्नित विद्यापीठ आणि/किंवा शिक्षण विभागाची अन्य कोणतीही शिक्षणशास्त्र विशेष शिक्षण पदवीशी समकक्ष पदवी उत्तीर्ण केलेले उमेदवार.<br>**(दोन)** प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये किमान ५० टक्के गुणांसह शिक्षणशास्त्र पदवी सामान्य अभ्यासक्रम आणि भारतीय पुनर्वास परिषदेने मान्यता दिलेली संबंधित विकलांगता क्षेत्राची विशेष शिक्षण पदविका उत्तीर्ण केलेले उमेदवार.<br>**(तीन)** पदव्युत्तर पदविका (शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पर्यंत) उत्तीर्ण केलेले उमेदवार.<br>**(चार)** विशिष्ट विशेषज्ञतेतील शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण केलेल्या उमेदवाराला क्रॉस विकलांगता/बहुवर्गीय शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.एड) मध्ये प्रवेश घेता येईल; परंतु याउलट करता येणार नाही. बहुवर्गीय शिक्षणशास्त्र पदवी असणाऱ्या उमेदवाराला शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी स्तरावर (एम.एड) एक विकलांगता असलेल्या विशेषज्ञतेसाठी प्रवेश देण्यात येणार नाही. तथापि, सी.बी.सी.एस. चा भाग म्हणून शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमात प्रवेश दिला जाऊ शकतो. विशिष्ट विकलांगतेसाठी अर्ह ठरण्यासाठी विशेष शिक्षण क्षेत्र **“ग”** अभ्यासक्रम आणि विशेषज्ञता अभ्यासक्रम पूर्ण करणे. क्षेत्र **“ग”** अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विनिर्दिष्ट विकलांगतेतील विशेष शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेश दिला जाऊ शकतो.<br>**(पाच)** कला, विज्ञान व वाणिज्य शिक्षणशास्त्र विशेष शिक्षण (४ वर्षीय संकलित) अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेले उमेदवार. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **(सहा)** उमेदवाराने भारतीय पुनर्वास परिषदेकडे नोंदणी केलेली असावी. |
| ३ | | शारीरिक शिक्षण पदव्युत्तर पदवी प्राप्त करण्यासाठी (एम.पी.एड) अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | उमेदवार भारतीय नागरिक असावा आणि त्याच्याकडे,<br>(क) किमान ५० टक्के इतक्या गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४० टक्के गुण) शारीरिक शिक्षणामधील पदवी (बी.पी.एड) किंवा त्या समकक्ष पदवी असावी.<br>**किंवा**<br>(ख) किमान ५० टक्के गुणांसह (फक्त महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या मागासवर्ग प्रवर्गाच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) आरोग्य व शारीरिक शिक्षण मध्ये विज्ञान स्नातक (बी.एस्सी.) पदवी असावी. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रोहिणी भालेकर,**
शासनाच्या उप सचिव.

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 2nd May 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATIONS OF ADMISSION AND FEES) ACT, 2015.

No. CET-2016/C.R.128/Mashi-2.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 read with clause (*r*) of section 2 of the Maharashtra Un-aided Private Professional Educational Institutions (Regulations of Admission and Fees) Act, 2015 (Mah. Act. No.XXVIII of 2015), and in suppression of the Government Notification, Higher and Technical Education Department, No. BEd.4615/C.R. 210/Mashi, Dated the 21st January 2016, the Government of Maharashtra hereby notifies,—

(*i*) the Professional Education Under Graduate Courses mentioned in column (2) of scheduled-A, appended hereto to be the Professional Education and specifies that the Eligibility conditions and requirements for admissions of the said Professional courses are such as mentioned in column (3) of the scheduled ;

(*ii*) the Professional Education Post Graduate Courses mentioned in column (2) of scheduled-B, appended hereto to be the Professional Education and specifies that the Eligibility conditions and requirements for admissions of the said Professional courses are such as mentioned in column (3) of the scheduled.

*Schedule-A*

| Sr. No. (1) | | Professional Educational Courses (2) | Eligibility Conditions and Requirements for Admission (3) |
|---|---|---|---|
| 1 | a | First year of Bachelor of education programme leading to Bachelor of Education (B.Ed.) Degree. | The candidate should be an Indian National and should have minimum 50% marks (Minimum 45% marks in case of Backward Class categories) either in the Bachelor's Degree and/or in the Master's Degree in Sciences/Social Sciences/ Humanity, Bachelor's in Engineering or Technology with specialization in sciences and mathematics with 55% marks (Minimum 50% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State). |
| | c | First year of Bachelor of education programme through open and distance learning system leading to Bachelor of Education (B.Ed.) Degree. | The candidate should be an Indian National and should be<br>(*i*) Trained in-service teachers in elementary education.<br>(*ii*) Candidates who have completed a NCTE (National Council for Teacher Education) recognized teacher education programme through face-to-face mode. |

| | | | |
|---|---|---|---|
| | d | First year of Bachelor of education programme (part-time) leading to Bachelor of Education (B.Ed.) Degree. | The candidate should be an Indian National and should have<br>(*i*) Upper Primary and Secondary school teachers who are in service as full time teacher for at least two years at the time of making application and who shall continue to be in service during the entire duration of the programme. The applicant shall be require to furnish a certificate to this effect from the Head of the school where the applicant is employed.<br>(*ii*) The applicant with minimum 50% marks (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) either in the Bachelor Degree and/ or in the Postgraduate Degree in Sciences/ Humanities/ Social Sciences or Bachelor degree in Engineering or Technology with background/ specialization in Science and Mathematics with minimum 50% marks (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) or any other qualification equivalent thereto. |
| | e | First year of 4 year integrated programme leading to (Bachelor of B.Sc.B.Ed. (Bachelor of Science Bachelor of Education)/ B.A.B.Ed. (Bachelor of Arts Bachelor of Education)/ degree. | The candidate should be an Indian National and should have minimum 50% marks (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) in the senior secondary/+2 or its equivalent. |
| 2 | a | First year of B.Ed. programme<br>leading to Bachelor of (Special Education–Visual Impairment) Degree. | The candidate should be an Indian National and should have with minimum 50% marks (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) either in the Bachelor's Degree and/or in the Master's degree in Sciences/ Social Sciences/ Humanities, Bachelor's in Engineering or Technology with specialization in science and Mathematics with minimum 55% marks (Minimum 50% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) or any other qualification equivalent thereto. |
| | b | First year of B.Ed. programme leading to Bachelor of (Special Education–Hearing Impairment) Degree. | |
| | c | First year of B.Ed. programme leading to Bachelor of (Special Education–Mental Retardation & Intellectual Disabilitiy) Degree. | |
| | d | First year of B.Ed. programme leading to Bachelor of (Special Education–Learning Disability) Degree. | |
| | e | First year of B.Ed. programme leading to Bachelor of (Special Education–Autism Spectrum Disorder) Degree. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | f | First year of B.Ed. programme leading to Bachelor of (Special Education–Multiple Disabilities) Degree. | |
| 3 | | First year of Bachelor of physical education programme leading to Bachelor of Physical Education (B.P.Ed.) Degree. | The candidate should be an Indian National and should have -<br>(*a*) Bachelor's degree in any discipline with minimum 50% marks (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) and having at least participation in the inter-college/ inter-zonal/ district/school competition in sports and games as recognized by the AIU (Association of Indian Universities)/ IOA (Indian Olympic Association)/ SGFI (School games Federation of India)/ Government of India.<br>**OR**<br>(*b*) Bachelor's degree in Physical Education with minimum 45% marks (Minimum 40% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State).<br>**OR**<br>(*c*) Bachelor's degree in any discipline with minimum 45% marks (Minimum 40% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) and studied Physical Education as compulsory/ elective subject.<br>**OR**<br>(*d*) Bachelor's degree with minimum 45% marks (Minimum 40% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) and having participated in National/Inter-University/ State Competitions or secured, 1st, 2nd or 3rd position in inter-college/ inter-zonal/ district/school competition in Sports and Games as recognized by the AIU/IOA/SGFI/Government of India.<br>**OR**<br>(*e*) Bachelor's degree with participation in international competitions or secured, 1st, 2nd or 3rd position in inter-college/ inter-zonal/district/school competition in sports and games as recognized by respective federation/AIU/IOA/SGFI/ Government of India. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **OR**<br>(*f*) Graduation with minimum 45% marks (Minimum 40% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) and at least three years of teaching experience (for deputed in-service candidates *i.e.* trained physical education teachers/ coaches) |

*Schedule-B*

| Sr. No.<br>(1) | | Professional Educational Courses<br>(2) | Eligibility Conditions and Requirements for Admission<br>(3) |
|---|---|---|---|
| 1 | a | First year of Master of education programme leading to Master of Education (M.Ed.) Degree. | The candidate should be an Indian National and should have passed with minimum 50% marks (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) or an equivalent grade in the following programmes :–<br>(*i*) B.Ed.,<br>(*ii*) B.A.B.Ed./ B.Sc.B.Ed.,<br>(*iii*) B.El.Ed.,<br>(*iv*) D.El.Ed. with an undergraduate degree [with 50% marks in each (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State)]. |
| | b | First year of three year integrated B.Ed.-M.Ed. (Bachelor of Education- Master of Education) Degree. | The candidate should be an Indian National and should have the following qualification:<br>**Essential-** A Postgraduate degree in Science/ Social Sciences/ Humanities from a recognised institution with a minimum 55% marks (Minimum 50% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State) or equivalent grade.<br>**Desirable-** The candidates have a demonstrated interest and experience in education. |
| 2 | a | First year of Master of Education-Special Education (M.Ed.Spl.Ed) Degree. | The admission of the degree of M.Ed.Spl.Ed. Degree shall be open to -<br>(*i*) A Candidate passed B.Ed (Spl.Ed.) with minimum 50% marks in respective disability area from a recognized university or any other degree considered equivalent to B.Ed Spl. Ed. from an affiliating university and/ or teaching department under any University recognized by UGC (University Grand Commission) with RCI (Rehabilitation Council of India) registration.<br>(*ii*) A Candidate passed the B.Ed. General course and completed Diploma in Education |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Special Education in respective disability area recognized by the Rehabilitation Council of India with minimum 50% marks in each course .<br>(*iii*) A Candidate passed PG Diploma (Till Academic session 2014-15).<br>(*iv*) A Candidate passed B.Ed. in particular specialization may be allowed for M.Ed. cross disability/multi-category (as and when offered) but the reverse is not allowed. B.Ed. with multi-category should not be admitted for specialization in a single disability at the M.Ed. level, however; as part of CBCS, these can be admitted to B.Ed. Special Education Area C, Courses and complete the Specialization Courses to qualify for a particular disability. On completion of Area C, these can be admitted to the M.Ed. Special Education in a specific disability.<br>(*v*) A student with B.A./B.Sc./B.Com. B.Ed.Spl. Ed. (4 years Integrated).<br>(*vi*) Candidate should have valid RCI registration. |
| 3 | | First year of Master of Physical education programme leading to Master of Physical Education (M.P.Ed.) Degree. | The candidate should be an Indian National and should have -<br>(*a*) Bachelor of Physical Education (B.P.Ed.) or equivalent with minimum 50% of Marks (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State).<br>OR<br>(*b*) Bachelor of Science (B.Sc.) in health and Physical Education with minimum 50% marks (Minimum 45% marks in case of candidates of Backward Class categories belonging only to Maharashtra State). |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**ROHINI BHALEKAR,**
Deputy Secretary to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.